माध्यम : - इंग्रजी
**कायम विना अनुदान**

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : - 21 JAN 2013

१९३३४/३८

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे.

**विषय :-नविन इंग्रजी माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता मिळणेबाबत...**
**सेकंड होम इंग्लिश मेडीयम स्कूल, धनकवडी, जि.पुणे..**

**संदर्भ-** १) शासन निर्णय क्र.नमाशा-२०१०/(९६/२०१०)/माशि-१ दि.१०.०३.२०१०
२) शासन निर्णय क्रमांक नमाशा-२०१०/(९६/१०)/माशि-१ दिनांक १४.१०.२०१०.
३) शासन पत्र क.इमाशा २०११/(५०/११)/माशि-१ दिनांक २८.२.२०१२
४) आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र. जि. प/माध्य/२२८८ दिनांक २५.१०.२०१२

उपरोक्त विषयासंदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशी विचारात घेऊन श्री सर्वोदय संस्था धनकवडी पुणे संस्थेच्या सेकंड होम इंग्लिश मिडीयम स्कूल, तळजाई पठार, धनकवडी, पुणे-४३ या माध्यमिक शाळेस खालील अटींवर आणि तपासणी अहवालातील सर्वच सूचनांची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्याच्या शर्तीवर **कायम विना अनुदान तत्वावर सन २०१२-२०१३** मध्ये **इयत्ता आठवी च्या वर्गास जून-२०१२ पासून तात्पुरती प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

१ नविन वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

२.माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.

३. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

४.संचनिश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.

५. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.

६. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.

७.शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

८. सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून तीन वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

इतर अटी :-

जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे

४.सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी.व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील.

.. २....

Scanned with OKEN Scanner